मराठी अस्मितेचा बुलंद आवाज!

वृत्तमानस

# कर्करोगग्रस्त रुग्णांना दिलासा देण्यासाठी 'लीलावती'ची अत्याधुनिक कॅन्सर केअर इन्स्टिट्यूटची घोषणा



प्रतिनिधी
मुंबई

लीलावती हॉस्पिटलने नवीन कॅन्सर केअर इन्स्टीट्युटची घोषणा केली आहे. कर्करोगाने ग्रस्त रुग्णांना दिलासा देण्यासाठी मुंबईत ३०० खाटांच्या या रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असून कर्करोग उपचारांमध्ये क्रांती घडवून आणण्यात याचा नक्कीच मोलाचा वाटणार राहणार आहे. लीलावती उपक्रम या कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्रातील नवीन कॅन्सर केअर इन्स्टीट्युटची घोषणा करण्यात आली असून यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री श्री प्रकाश आबिटकर, महाराष्ट्रातील माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, महाराष्ट्राचे वाहतूक मंत्री प्रताप सरनाईक, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मेयो क्लिनिकचे आंतरराष्ट्रीय आणि एंटरप्राइज ऑटोमेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बिजू सॅमकुट्टी, लीलावती हॉस्पिटलच्या संस्थापक आणि स्थायी विश्वस्त श्रीमती चारू मेहता, लीलावती हॉस्पिटलचे स्थायी विश्वस्त राजेश मेहता, लीलावती हॉस्पिटलचे स्थायी विश्वस्त प्रशांत मेहता, लीलावती हॉस्पिटलचे स्थायी विश्वस्त राजीव मेहता उपस्थित होते. नव्याने सुरु केली जाणारी ही कॅन्सर केअर संस्था रुग्णसेवेतील प्रत्येक टप्प्यांवर अचुक उपचार आहे. याठिकाणी प्रत्येक रुग्णाला वैयक्तिकरित्या तसेच उत्तमोत्तम वैद्यकिय सेवा मिळेल याची खात्री केली जाणार आहे. आता रुग्णांना उपचारांसाठी परदेशात जाण्याची गरज भासणार नाही आणि त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचतील.लीलावती हॉस्पिटलचे स्थायी विश्वस्त राजेश मेहता आणि प्रशांत मेहता सांगतात कि, आम्हाला ही कॅन्सर केअर इन्स्टीट्युट मुंबईत सुरु करताना अतिशय आनंद होत आहे. आमच्या नर्सिंग कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी आंतरराष्ट्रीय

## भारतातील पहिल्या नर्सिंग एक्सलन्स प्रोग्रामसाठी अमेरिकेतील मेयो क्लिनिकसोबत केली हातमिळवणी

स्तरावरील मेयो क्लिनिकचे विशेष सहकार्य याठिकाणी लाभणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वित्झर्लंडच्या दावोस येथून चित्रफितीद्वारे संदेश पाठविला असून, लीलावती हॉस्पिटल आणि मेयो क्लिनिकचे त्यांनी यावेळी अभिनंदन केले. ते म्हणाले की जागतिक आरोग्यसेवेला पुढे नेण्यासाठी मी लीलावती हॉस्पिटलच्या नेतृत्वाचे आणि मेयो क्लिनिकचे मनापासून आभार मानतो.मेयो क्लिनिकने भारतातील आरोग्यसेवा क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाची रुग्णसेवा आणण्यासाठी केलेले सर्व उपक्रम हे नर्स, डॉक्टर आणि वैद्यकिय कर्मचाऱ्यांकरिता फायदेशीर ठरणार आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लीलावती रुग्णालयाचे अभिनंदन करत अमेरिकेतील जगप्रसिद्ध मेयो क्लिनिकसोबत उचललेले हे पाऊल हे वैद्यकिय क्षेत्रात आणखी प्रगती घडवून आणतील अशी आशा व्यक्त केली. लीलावती हॉस्पिटल आणि मेयो क्लिनिकने स्थापन केलेल्या कर्करोग रुग्णालयाचा उल्लेख मी केवळ रुग्णालय म्हणून करणार नाही तर ते एक 'आरोग्य मंदिर' आहे. परिचारिका या आमच्या लाडक्या बहिणी असून त्यांना मेयो क्लिनिककडून विशेष प्रशिक्षण दिले जाईल.